॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी ई-रिक्षा सुविधेचा प्रारंभ कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते आज दि. १४ जुलै रोजी करण्यात आला.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य व वाहन समिती अध्यक्ष -नितीन झाल्टे, प्रा. म.सु. पगारे, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, ॲड अमोल पाटील, प्रा. महेंद्र रघुवंशी, प्रा. पवित्रा पाटील, डॉ. संदीप पाटील, राजेंद्र नन्नवरे कुलसचिव डॉ.विनोद पाटील, सीए रवींद्र पाटील उपस्थित होते. विद्यापीठ वाहन समितीने शिफारस केल्यानुसार विद्यापीठातील प्रशाळेत येणाऱ्या विद्यार्थी व बाहेरगावावरून विविध कामासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार ते विद्यापीठ प्रशासकीय इमारत या मार्गावर या ई-रिक्षा सुविधेचा वापर होणार आहे. ही सुविधा पुरविण्यासाठी विद्यापीठाने दोन ई-रिक्षा खरेदी केल्या आहेत. विद्यार्थ्यांना अल्प दरात ही सुविधा उपलब्ध होणार आहे. या सुविधेमुळे विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टळणार आहे. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकुरवाळे, सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी शरद पाटील व सहायक संजय पाटील यांचेसह विद्यापीठ कर्मचारी उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ. एस.एस. राजपूत यांचे सदस्यपदी नामनिर्देशन कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा -२०१६ मधील कलम ३०(४)(डी) नुसार विद्यापीठाच्या अधिष्ठातांचे नामनिर्देशन करण्याची तरतूद आहे. त्याअन्वये कुलगुरूंनी प्राचार्य डॉ. एस.एस. राजपूत यांचे नामनिर्देशन केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १४ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कुलगुरू संशोधन प्रोत्साहन योजनेंतर्गत सात विद्यार्थ्यांना रिसर्च पब्लिकेशन ॲवार्ड व एका विद्यार्थ्यास पेटंट पब्लिकेशन ॲवार्ड देण्यात आला तर स्वयम् च्या कोर्सेसमध्ये प्राविण्य मिळवलेल्या सहा विद्यार्थ्यांचा देखील सन्मान करण्यात आला.

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने आयोजित विद्यापीठस्तरीय कुलगुरू युवा प्रेरणा शिबिराचा समारोप आज दि. १४ जुलै रोजी विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मंचावर व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्रा.म. सु पगारे, प्रा. पवित्रा पाटील , कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिसभा सदस्य अमोल मराठे, स्वप्नाली काळे, नितीन ठाकूर, केदारनाथ कवडीवाले, रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्र. कुलगुरू एस टी इंगळे म्हणाले की, राष्ट्रभक्ती, स्वयंशिस्त, वक्तशीरपणा यासह विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विद्यापीठातर्फे या शिबिराचे आयोजन करण्यात येते. या शिबिरातील समृद्ध ज्ञान परंपरा, विकसित भारत, जलसंवर्धन, उद्योजकता विकास, राष्ट्र विकास या विषयातील व्याख्यातांनी दिलेल्या माहितीचा रा.से.यो. स्वयंसेवकांनी लाभ घ्यावा व चांगल्या बाबी आत्मसात कराव्यात.

व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. अमोल पाटील म्हणाले की, स्थापनेनंतर विद्यापीठाच्या विकासासाठी अनेकांनी योगदान दिले यात रासेयो स्वयंसेवकांचा देखील समावेश आहे. वाढत्या वयासोबत आपण आपले शिस्तबद्ध पद्धतीने जीवन जगले पाहिजे. या सात दिवसात जे तुम्ही शिकले ते तुम्हाला पुढील वाटचालीसाठी उपयोगी पडेल. अभ्यासक्रमा व्यतिरिक्त सांस्कृतिक, बौद्धिक आणि सामाजिक विषयांचे ज्ञान तुम्हाला मिळाले. विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक बनून समाजासाठी उपयोगी आले पाहिजे.

प्रास्ताविकात विद्यापीठाचे रासयो चे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी शिबिरात गेल्या सात दिवसात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर केला. या शिबिरात एकूण २५० स्वयंसेवक सहभागी आहेत. या शिबिरात१२३ मुली व १२७ मुले असून या सात दिवस चाललेल्या संस्कार यज्ञातून या स्वयंसेवकांना भविष्यासाठी एक उत्तम प्रकारची शिदोरी प्राप्त झाली आहे. निश्चितच याचा फायदा पुढे सामाजिक कार्यासाठी स्वयंसेवक करतील कशी भावना देखील त्यांनी व्यक्त केली.

समारोपाच्या कार्यक्रमात चंद्रदीप बाविस्कर, प्रेरणा भालेराव, रोहन गावित, स्नेहा बारी, सनी पवार, हर्षदा गिरासे, दिव्या पाटील, सागर कोळी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. दिनेश पाटील, साक्री विभागाचे विभागीय समन्वयक प्रा. विश्वास भामरे या शिबिराचे संघ व्यवस्थापक डॉ. विशाल देशमुख, डॉ. मनोज इंगोले, डॉ. जयश्री भिरुडे व शिबिरात सहभागी स्वयंसेवक उपस्थित होते. प्रा. दिनेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा.विजय पाटील यांनी मानले.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १४ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता